# Criterion 2- 2.1.2 Summary of Reservation Letters issued by State Govt or Central Govt policy document for reserved categories (SC, ST, OBC, Divyangjan, etc).

| Sr. No | Subject | Dated | Description | Issued By |
|---|---|---|---|---|
| 1 | SEBC Reservation Circular -1 | 24/11/2020 | Circular in regional language describing the reservation quota for Special Economically Backward Class (SEBC) | Savitribai Phule Pune University/Government of Maharashtra |
| 2 | SEBC & EWS Admission Reservation Circular - 2 | 8/6/2019 | | |
| 3 | Rajashree Chatrapati Shahu Maharaj Education Scholarship Circular | 11/7/2019 | Circular in regional language describing Rajashree Chatrapati Shahu Maharaj Education Scholarship | Government of Maharashtra |
| 4 | Reservation circular for Person With Disability (PWD) | 12/7/2018 | Circular in regional language describing the reservation quota for Person with Disability (PWD) | Savitribai Phule Pune University |
| 5 | Reservation for Orphan Students | 3/5/2018 | Circular in regional language describing the Reservation for Orphan Students. | Savitribai Phule Pune University/ Government of Maharashtra |

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# SEBC Reservation Circular -1

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

मा.सर्वोच्च न्यायालयाने विशेष अनुमती याचिका क्र.१५७३७/२०१९ वर दि.०९.०९.२०२० रोजी एसईबीसी आरक्षणास दिलेल्या अंतरिम स्थगितीच्या आदेशास अनुसरून सन २०२०-२१ मधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाबाबत करावयाची कार्यवाही.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक – बीसीसी २०२०/प्र.क्र.२९५/१६-ब
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२.
दिनांक – २५ नोव्हेंबर, २०२०

प्रस्तावना -:

महाराष्ट्र राज्य सामाजिक आणि शैक्षणिक मागास (एसईबीसी) वर्गाकरीता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाची आणि राज्यातील नियंत्रणा खालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अधिनियम, २०१८ च्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेल्या याचिकेवर मा.उच्च न्यायालयाने दि.२७.०६.२०१९ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. सदरील याचिकांवर मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजीच्या आदेशान्वये अंतरीम स्थगिती दिलेली आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने एसईबीसी आरक्षणास दिलेल्या उपरोक्त अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील प्रवेशाबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत महाधिवक्ता,महाराष्ट्र राज्य यांनी दिलेले कायदेशिर अभिप्राय विचारात घेऊन योग्य त्या सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.त्यानुसार शासन पुढील प्रमाणे सुचना देत आहे

शासन निर्णय :-

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०९.०९.२०२० रोजी विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिका यामध्ये दिलेल्या अंतरिम स्थगिती आदेशास अनुसरून संबंधित प्रशासकीय विभागांनी सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षातील दि.०९.०९.२०२० नंतरची सर्व शैक्षणिक संस्थांमधील प्रवेश प्रक्रिया एसईबीसी वर्गाकरिता आरक्षण न ठेवता पार पाडावी. ज्या विद्यार्थ्यांनी दिनांक ९ सप्टेंबर

eSign Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)
Scanned by CamScanner

२०२० पूर्वी एईसीबीसी प्रवर्गातून प्रवेशाकरिता अर्ज केले असतील परंतु त्यांना प्रवेश देण्यात आले नसतील अशा एसईबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना खुल्या प्रवर्गातून प्रवेश देण्यात यावे.

३. वरील सुचना या मा.सर्वोच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेली विशेष अनुज्ञा याचिका क्र.१५७३७/२०१९ व इतर याचिकांमधील निर्णयाच्या तसेच राज्य शासनाने या कामी देण्यात आलेली अंतरीम स्थगिती उठविण्याकरीता दाखल केलेल्या अर्जाच्या निर्णयाच्या अधीन राहतील.

४. हा शासन निर्णय अंतरिम स्थगिती उठविण्याच्या अर्जाच्या अंतिम निकालापर्यंत लागू राहील.

५. वरील निर्णयांची अंमलबजावणी सर्व संबंधित प्रशासकीय विभागांनी तात्काळ करावी व संबंधित विभागांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सचिव (साविस), सामान्य प्रशासन विभाग यांचेकडे सादर करावा.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक --- असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे. २०२०११२०१९४९४६१८०७

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(र. अं. खडसे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधीपक्ष नेता, महाराष्ट्र विधानसभा/ विधानपरिषद,महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,मुंबई.
२. मा. सर्व सन्माननिय विधानसभा/ विधानपरिषद,व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य
३. मा. राज्यपालांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई.
४. मा. मुख्यमंत्र्यांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान परिषद) विधानभवन, मुंबई.
६. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, (विधान सभा) विधानभवन, मुंबई.
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव.
८. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-१, मुंबई,
९. महालेखापाल, लेखा व अनुज्ञेयता, महाराष्ट्र-२, नागपूर,

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१२.प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, अपिल शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१३.प्रबंधक, मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर.
१४.प्रबंधक, मा. लोक आयुक्त व उप लोक आयुक्त, मुंबई.
१५.सर्व विभागीय आयुक्त/सर्व जिल्हाधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१६.सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य.
१७.सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
१८. सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव ,मंत्रालय ,मुंबई.
१९.मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२०.सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
२१.सचिव, राज्य माहिती आयोग, मुंबई.
२२.सरकारी वकील, उच्च न्यायालय, मुळ शाखा व अपील शाखा, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२३.सरकारी वकील, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद, नागपूर,
२४. सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
२५.सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/नगरपालिका,
२६.विधिमंडळ ग्रंथालय, महाराष्ट्र विधानभवन, मुंबई (१० प्रती),
२७. सर्व महामंडळे , मंडळे आणि सार्वजनिक उपक्रम यांचे व्यवस्थापकीय संचालक,
२८. निवड नस्ती/कार्यासन १६-अ.

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# SEBC & EWS Admission Reservation Circular -2

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
"पूर्वीचे पुणे विद्यापीठ"

दुरध्वनी क्र. :- ०२०-२५६०११८९/११९०
फॅक्स नं. - ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ:- www.unipune.ac.in

आरक्षण विभाग
गणेशखिंड, पुणे-४११००७
ई-मेल:- arakshan_ar@unipune.ac.in

संदर्भ क्रमांकः- आरक्षण /ओ-२२/५०४

दिनांक :-०८/०६/२०१९.

प्रति,
मा.प्राचार्य/मा.संचालक,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ संलग्नीत सर्व महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था.

**विषय:- महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी) वर्गास तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबत....**

संदर्भ:- शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३, दिनांक ०८/०३/२०१९.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भीय शासन निर्णयास अनुसरून आपणास कळविण्यात येते की, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडील शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३, दिनांक ०८/०३/२०१९ नुसार शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशाबाबतची पुढील योग्य ती कार्यवाही करावी, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासु,

8/6/19

उपकुलसचिव
(आरक्षण कक्ष)

**सोबत:- वरीलप्रमाणे**

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गांस तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी जागा आरक्षित ठेवण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन परिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र. २२/विशि-३**
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- ८ मार्च, २०१९.

**संदर्भ :-**

१) विधी व न्याय विभागाचा सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, दि. ३० नोव्हेंबर, २०१८.

२) सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दि. १२ फेब्रुवारी, २०१९.

**प्रस्तावना:-**

महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या वर्गांच्या प्रगतीसाठी राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाकरिता जागांच्या आरक्षणासाठी आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांच्या आणि पदांच्या आरक्षणासाठी आणि तत्संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींची तरतुद करण्यासाठीचा अधिनियम उपरोक्त संदर्भ क्रमांक १ अन्वये महाराष्ट्र शासनाच्या दि. ३० नोव्हेंबर, २०१८ च्या राजपत्रामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर अधिनियमातील मुद्दा क्र. ४ (१) (क), अन्वये राज्यातील अनुदानित तसेच विनाअनुदानित शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाच्या एकूण १६% जागा मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) नागरिकांच्या प्रवर्गासाठी आरक्षित करण्यात आल्या आहेत.

तसेच संदर्भ क्रमांक २ च्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी शासकीय सेवा व शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता १०% जागा आरक्षित करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच सदर शासन निर्णयातील मुद्दा क्र. ४ अन्वये शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाबाबतचे आवश्यक आदेश सर्व संबंधीत विभागांनी तात्काळ निर्गमित करण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

सामान्य प्रशासन विभागाने उपरोक्त शासन निर्णयान्वये आदेशीत केल्यानुसार मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गांस १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा महाराष्ट्र राज्यातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता आरक्षित करण्याबाबत या विभागाच्या अधिनस्त असलेल्या सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठांना निर्देश देण्याकरिता याबाबतचे शासन परिपत्रक निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

शासन परिपत्रक:-

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ व २ ला अनुसरुन महाराष्ट्र राज्यातील सर्व सार्वजनिक अकृषी विद्यापीठातील शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशाकरिता मराठा समाजासह सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (एसईबीसी) वर्गास १६% जागा तसेच खुल्या प्रवर्गातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटकांसाठी १०% जागा आरक्षित ठेवण्यात याव्यात.

२. शासनाने निर्धारित केलेले शैक्षणिक संस्थातील प्रवेशामधील सदर आरक्षण राज्यातील उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत येणाऱ्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थाखेरीज सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, विधी विद्यापीठे, स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे, त्यांच्याशी संलग्नीत असणारी सर्व अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालये व स्वायत्त महाविद्यालये यांना लागू होईल. सदर आदेशाची प्रभावी अंमलबजावणी होईल हे पाहण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठांची राहील.

३. शैक्षणिक संस्थामध्ये प्रवेशासाठी विद्यापीठांनी/संस्थांनी नियम / परिनियम तयार केले असतील आणि त्यामध्ये विविध सामाजिक घटकांचे आरक्षण दर्शविण्यात आले असेल तर या आरक्षणाच्या अनुषंगाने त्या नियमात/ परिनियमात संबंधितांनी विहित कार्यपध्दतीनुसार आवश्यक त्या सुधारणा तातडीने कराव्यात.

४. सर्व विद्यापीठांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शैक्षणिक संस्थांच्या निदर्शनास आणून द्यावे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०३०८१४४०३०९२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SIDDHARTH KHARAT

Digitally signed by SIDDHARTH KHARAT
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=6f8cb55012423727bece629d954713c1ec2962a9ca9b909643170e56321cfd24, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=22c1b7c1413e77554a8e64cbc60b74fb6471605c32acf8b9b51b2b018fefdc0b, ou=H AND TED, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SIDDHARTH KHARAT
Date: 2019.03.08 14:43:01 +05'30'

( सिध्दार्थ खरात )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मुंबई.
२. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्यअधिकारी, मंत्रालय, मुंबई.
४. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. सचिव,उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
६. सर्व अकृषी विद्यापीठांचे कुलगुरु / कुलसचिव.
७. सर्व विधि विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव.

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

८. सर्व स्वंय अर्थसहाय्यीत / अभिमत विद्यापीठांचे कुलगुरू/ कुलसचिव
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०. संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य.
१२. सर्व विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
१३.उप सचिव, (विशि) (मशि) (तांशि) उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
१४. उप सचिव (१६अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.निवड नस्ती - कार्यासन विशि-३.

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# Rajashree Chatrapati Shahu Maharaj Education Scholarship Circular

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

**सामाजिक व आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्ग व**
**विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,**
**शासन निर्णय क्र. सीबीसी-२०१९/प्र.क्र.१०८/मावक**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : ११ जुलै, २०१९.**

**वाचा :-** १) सन २०१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.६२ , दिनांक ३० नोव्हेंबर, २०१८.
२) सन २०१९ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.०७ , दिनांक ३ जुलै, २०१९.
३) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. आस्थाप्र-२०१७/प्र.क्र.२६४/आस्था-१, दिनांक २५ जून, २०१९.

**प्रस्तावना:**

वाचा क्र. १ येथे नमूद दि. ३० नोव्हेंबर २०१८ रोजीच्या अधिनियमाद्वारे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग नव्याने घोषित करण्यात आला असून त्यामध्ये मराठा समाजाचा समावेश करण्यात आला आहे.

वाचा क्र.२ येथे नमूद सन २०१९ चा अधिनियम क्र. ७ दि. ३ जुलै, २०१९ अन्वये वाचा क्र. १ येथे नमूद अधिनियमातील कलम ४ क येथे सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गासाठी विनिर्दिष्ट आरक्षण १२ % तर कलम ४ ख येथे विनिर्दिष्ट आरक्षण १३ % एवढे विहित करण्यात आले आहे.

वाचा क्र. ३ येथे नमूद सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. २५ जुन २०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्ग कल्याण हे विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागास हस्तांतरीत करण्यात आले आहेत.

मा. मंत्री महसुल तथा अध्यक्ष मंत्रिमंडळ उपसमिती यांच्या अध्यक्षतेखाली सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्यांना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करणेबाबत दि. २६.६.२०१९ रोजी दुपारी ३.०० वाजता विधानभवन, मुंबई येथे बैठक संपन्न झाली. सदर बैठकीत झालेल्या निर्णयानुसार सदर योजना सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

मागासप्रवर्गातील विद्यार्थ्याना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. तद्नुषंगाने खालीलप्रमाणे शासननिर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासप्रवर्गातील विद्यार्थ्याना सन २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता विस्तारीत योजना लागू करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सामाजिक न्याय व विशेष सहाय विभागाच्या दि. २५.६.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मराठा आरक्षण व SEBC प्रवर्ग कल्याण हा विषय विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडे सोपविण्यात आलेला आहे. SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) लागू करण्यासाठी आवश्यक ती प्रशासकीय कार्यवाही पूर्ण करण्यास (उदाहरणार्थ मा. मंत्रीमंडळाची मान्यता/लेखाशिर्ष/शासन निर्णय/अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध करुन घेणे इ.) किमान ६ महिन्यांचा कालावधी लागणार आहे. ही बाब तसेच विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील अपुरे मनुष्यबळ, आगामी विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीच्या अनुषंगाने लागू होणाऱ्या आदर्श आचारसंहितेमुळे विभागाकडे उपलब्ध होणारा अल्प कालावधी विचारात घेऊन SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ.पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा पहिला हप्ता संबंधित प्रशासकीय विभागानी सदर दोन्ही योजनांसाठी कार्यान्वित लेखाशिर्षाखाली उपलब्ध असलेल्या वित्तीय तरतुदीतून अदा करावा.

३. उक्त नमूद दोन्ही योजनांसाठी SEBC प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दयावयाचा दुसरा हप्ता अदा करण्याच्या कालावधीपर्यंत विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाची याबाबत आवश्यकती प्रशासकीय कार्यवाही पुर्ण झाली तरच शिष्यवृत्तीचा दुसरा हप्ता देण्याची कार्यवाही विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागामार्फत करण्यात येईल.

४. त्याचप्रमाणे सदर दोन्ही योजनांचा लाभ आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाच्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना देण्यासाठी आजमितीस जी यंत्रणा व कार्यपध्दती, शासननिर्णय, पात्रतेच्या अटी शर्ती अस्तित्वात आहे त्यात कोणताही बदल न करता प्रचलित यंत्रणा व कार्यपध्दतीद्वारे राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्यात यावा.

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

५. महाडिबीटी पोर्टलवर राज्यातील सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजना तसेच डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना (विस्तारीत योजनेसह) या दोन्ही योजनांचा लाभ संबंधित प्रशासकीय विभागाकडून देण्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही देखील उच्च प्राधान्याने करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे. त्याचा संगणक साकेतांक क्रमांक २०१९०७१११२१६५००१२२ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्र राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Vijay Vithalrao Weladi

Digitally signed by Vijay Vithalrao Weladi
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=4c33d11360090dc60a00f603b2d1b16bd83f0256338774a947f737fede7af039, serialNumber=1e395c154c970776fc5115641f8d6663d6a765cfcf30c8d1f594706468740b6d, cn=Vijay Vithalrao Weladi
Date: 2019.07.11 13:24:10 +05'30'

(वि.वि.वेलादी)
**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा. मंत्री/मा. राज्यमंत्री, (सर्व) मंत्रालय, मुंबई.मा. मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
५. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
७. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
८. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
९. प्रधान सचिव (कृषी), कृषी व प.दु.म. विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
११.प्रधान सचिव (पशु संवर्धन, दुग्ध विकास व मत्स्य व्यवसाय) विभाग, मंत्रालय, मुंबई
१२.प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
१४.सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१५.सर्व सन्मानीय विधानपरिषद व विधानसभा सदस्य
१६.महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई



eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

१७.महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर
१८. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
१९.मुख्य महानगर दंडाधिकारी, मुंबई
२०.संचालक, माहिती तंत्रज्ञान (सा.प्र.वि), मंत्रालय, मुंबई.
२१.सर्व विभागीय आयुक्त
२२.सर्व जिल्हाधिकारी

आपण सदर योजना सर्व संबंधित विभागांकडून काटेकोरपणे राबविल्या जाईल यासाठी आवश्यकती कार्यवाही करावी.

२३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२४.समाजकल्याण अधिकारी, जिल्हापरिषद (सर्व)
२५.अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जातपडताळणी समिती (सर्व)
२६.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
२७.सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल) तथा उपविभागीय दंडाधिकारी
२८. सर्व तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी
२९.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, मुंबई
३०.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा , मुंबई
३१.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- नागपूर
३२.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- नागपूर
३३.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३४.प्रबंधक, उच्च न्यायालय, मुळ न्याय अपिल शाखा, खंडपीठ- औरंगाबाद
३५. आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
३७. संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३८. संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३९.संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
४०.सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग, पुणे
४१.व्यवस्थापकीय संचालक, सारथी, पुणे
४२.मंत्री, (महसूल), महसूल व वन विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४३.मा.मंत्री (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई



eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# Reservation circular for Person with Disability (PWD)

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in


जावक क्र. आरक्षण/ओ-२२/८७९

दिनांक : १२/०७/२०१८.

प्रति,

१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७.
२. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
३. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था.

**विषय** :- तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षणाच्या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थामध्ये प्रवेशासाठी केंद्र शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act,२०१६ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करणेबाबत.

**संदर्भ** :- शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३१/तांशि-४, दिनांक २५जुन२०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय उच्च व तंत्र शिक्षण विभाग मुंबई-४०० ०३२. यांच्या शासन निर्णयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण यांचा उक्त शासन निर्णय पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता सोबत जोडत आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सुचनांचे तंतोतंत पालन करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

12/7/18

उपकुलसचिव,
(आरक्षण कक्ष)

**सोबत** : वरीलप्रमाणे.

D:\Circulars\Letter-O-22.docx


eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील उच्च शिक्षणाच्या शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये प्रवेशासाठी केंद्र शासनाच्या The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या तरतूदीनुसार कार्यवाही करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३१/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २५ जून, २०१८

संदर्भ : १) The Rights of Persons with Disabilities Act, २०१६.
२) आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/प्र-७/मोफतशिक्षण/क-३१(२)/२०१७-१८/२८, दिनांक २०/६/२०१७.
३) संचालक तंत्र शिक्षण यांचे पत्र क्र. २-अ/एडीएम/२०१८/४७४, दिनांक १०/४/२०१८.

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने The rights of persons with Disabilities Act, २०१६, दिनांक २८ डिसेंबर,२०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द केला आहे. या अधिनियमाच्या कलम ३२ मध्ये पुढीलप्रमाणे तरतूद आहे :-

१) All Government institutions of higher education and other higher education institutions receiving aid from the Government shall reserve not less than five per cent seats for persons with benchmark disabilities.
२) The person with benchmark disabilities shall be given an upper age relaxation of five years for admission in institutions of higher education.

केंद्र शासनाच्या या अधिनियमातील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व असणाऱ्या व्यक्ती/ विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवणे आवश्यक आहे.

शासन निर्णय :-

The Rights of Persons with Disabilities Act, २०१६ च्या कलम ३२ (१) मधील तरतूदीनुसार तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील पदवी व पदव्युत्तर शिक्षण देणाऱ्या विविध शासकीय व अशासकीय अनुदानित संस्थांमध्ये लक्षणीय अपंगत्व

eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

असणाऱ्या व्यक्ती/ विद्यार्थ्यांकरीता ५ टक्के इतक्या जागा राखीव ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. या निर्णयाची अंमलबजावणी शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून करण्यात यावी. यासाठी विविध अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमामध्ये आवश्यक ती सुधारणा करण्यात यावी.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१८०६२५१८०५५६०४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sanjay A. Dharurkar

Digitally signed by Sanjay A. Dharurkar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher and Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=637145fd393d6d5c713e94e6da7bc6bee23011448b7fc64d138630b9c76ee7a2, cn=Sanjay A. Dharurkar
Date: 2018.06.26 15:46:54 +05'30'

(संजय औ.धारुरकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा तथा सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, ८ वा मजला, न्यु एक्सलसिअर इमारत, ए.के.नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१
२. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. आयुक्त, अपंग कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सर्व सहसंचालक, तंत्र शिक्षण, विभागीय कार्यालय.
५. कुलसचिव, सर्व अकृषी सार्वजनिक विद्यापीठे.
६. सर्व संबंधित संस्था (तंत्र शिक्षण संचालनालयामार्फत).
७. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवड नस्ती/तांशि-४.



eSign
Signed by: Shubhangee Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08 PM)

# Reservation for Orphan Students

eSign
Signed by: Shubhangee
Ramaswamy
Reason: Official Document
Location: Pune, India
Date: 05-Aug-2024 (06:08
PM)

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्र. : २५६०११८९/९०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३८८
संकेतस्थळ : www.unipune.ac.in

**आरक्षण कक्ष**
गणेशखिंड, पुणे - ४११००७.
ई-मेल: arakshan_ar@unipune.ac.in


जावक क्र. आरक्षण/ओ-२२/५९०

दिनांक : ०३/०५/२०१८.

प्रति,
१. मा. विभागप्रमुख, सर्व शैक्षणिक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ७.
२. मा. प्राचार्य, विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालये,
३. मा. संचालक, विद्यापीठाशी संलग्नित सर्व संस्था.

**विषय** :- अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १ टक्का समांतर आरक्षण देणेबाबत...
**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. अमुजा-२०११/ प्र.क्र.२१२/का-३, दि. २ एप्रिल, २०१८.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषय व संदर्भिय महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मुंबई यांच्या शासन निर्णयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, महाराष्ट्र शासन, महिला व बाल विकास विभाग, मुंबई यांचा उक्त शासन निर्णय पुढील योग्य त्या कार्यवाहीकरीता सोबत जोडत आहे. सदर शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे सुचनांचे तंतोतंत पालन करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,
1293 8/5/18
उपकुलसचिव,
(आरक्षण कक्ष)

**सोबत** : वरीलप्रमाणे.

**प्रत**:- कार्यालयीन संचिका (ओ-२२)

D:\Circulars\Letter-O-22.docx

अनाथ मुलांना खुल्या प्रवर्गातून १% टक्का समांतर आरक्षण देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**महिला व बाल विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः अमुजा-२०११/ प्र.क्र. २१२/ का-३,**
**नविन प्रशासन भवन, ३ रा मजला,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०००३२.**
**दिनांक - ०२ एप्रिल, २०१८.**

**वाचा-** शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग, क्र.संकीर्ण-२०१३/प्र.क्र.१०९/का-३, दिनांक ०६.०६.२०१६.

**प्रस्तावना :-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना पोलीस, स्वयंसेवी संस्था, पालक यांचेकडून बाल कल्याण समितीमार्फत बालगृहात प्रवेश दिला जातो. ० ते १८ वयोगटातील अशा मुलांना बालगृहामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य सुविधा, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादी सुविधा पुरविल्या जातात व पुनर्वसनासाठी प्रयत्न केले जातात. अनाथ मुलांना त्यांचा संस्थेतील कालावधी संपल्यानंतर संस्थेच्या बाहेर पडल्यानंतर अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. अनाथ मुलांची जात नक्की माहिती नसल्याने, त्यांना कोणत्या एका विशिष्ट प्रवर्गात समाविष्ट करता येत नाही. जातीचा दाखला नसल्यामुळे, त्यांना विविध शासकीय लाभापासून वंचित रहावे लागते. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात अनेक अडचणी निर्माण होतात. अनाथ मुलांकडे कोणतीही कागदपत्रे व पुरावे नसल्यामुळे, त्यांना जातीचे प्रमाणपत्र मिळत नाही व त्यामुळे त्यांना विविध शासकीय सवलतींपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा, याकरीता आरक्षण लागू करणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत अनाथ मुलांना शिक्षण व नोकरी यामध्ये १% समांतर आरक्षण लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णयः-**

बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ अन्वये काळजी व संरक्षणाची गरज असलेल्या अनाथ, निराधार बालकांना संस्थेतून बाहेर पडल्यानंतर जातीचा दाखला नसल्यामुळे विविध शासकीय लाभांपासून वंचित रहावे लागते त्यामुळे अनाथ मुलांना राज्य शासनाच्या विविध सवलतींचा लाभ घेता यावा याकरीता शिक्षण व नोकरी यामध्ये खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण लागू करण्यात येत आहे. त्यासाठी खालील अटी व शर्ती निश्चित करण्यात येत आहेत-

१) बालगृहातील व इतर अनाथ मुलांपैकी महिला व बाल विकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र असणा-या मुलांसाठीच हे आरक्षण लागू राहील. ज्या मुलांच्या कागदपत्रावर कोणत्याही जातीचा उल्लेख नाही व ज्याचे आईवडील, काका-काकू, आजी-आजोबा व चुलत भावंडे व इतर नातेवाईक यापैकी कोणाबाबतही माहिती उपलब्ध नाही, अशा मुलांनाच अनाथ आरक्षण लागू राहील.

२) तसेच ज्या मुलांचे आई वडिल हयात नसून त्यांचेकडे जातीचे प्रमाणपत्र नाही, अशा मुलांच्या बाबतीत त्यांनी संबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक राहील. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचेकडून संबंधित जिल्ह्याच्या बाल कल्याण समितीकडे सदर अर्ज पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीकडून सदर अर्जाची तपासणी करण्यात येईल व आवश्यकतेनुसार पोलीस / महसूल विभागाच्या यंत्रणेकडून छाननी करुन तसेच मुलाखत घेऊन अर्ज प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून ४० दिवसात आपली शिफारस संबंधित विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडे निर्णयार्थ पाठविण्यात येईल. बाल कल्याण समितीची शिफारस विचारात घेऊन विभागीय उपायुक्त, महिला व बाल विकास यांचेकडून अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच शिफारस अमान्य करण्यात येऊन अनाथ प्रमाणपत्र नाकारण्यात आल्यास विभागीय उपायुक्त महिला व बाल विकास यांचेकडून कारणासहित सदर अर्ज बाल कल्याण समितीकडे परत पाठविण्यात येईल. प्रमाणपत्राच्या अनुषंगाने जर कांही तक्रार असल्यास यासंदर्भात अपिलीय प्राधिकारी हे आयुक्त, महिला व बाल विकास हे राहतील.

३) उपरोक्त वाचा मधील दिनांक ०६.०६.२०१६ च्या शासन निर्णयानुसार महिला व बाल विकास विभागामार्फत बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमांतर्गत मान्यता प्राप्त (अनुदानित/विनाअनुदानित) संस्थामध्ये दाखल मुलांना अनाथ प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यवाही विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार अनाथ प्रमाणपत्र देण्याची कार्यवाही करण्यात यावी.

४) सदर निर्णय, शासन निर्णय लागू झाल्याच्या दिनांकापासून पुढे होणा-या सरळसेवा भरतीसाठी लागू राहील.

५) शासन सेवेत प्रवेशासाठी अनाथ मुलांसाठी खुल्या प्रवर्गातून १% समांतर आरक्षण गट " अ" ते "ड"च्या सर्व पदावर लागू राहील.

६) सदर आरक्षणाची गणना पद भरती करण्यात येणा-या रिक्त पदावर करण्यात यावी.

७) संबंधित भरती वर्षात अनाथ उमेदवार उपलब्ध न झाल्यास आरक्षणाचा अनुशेष पुढे न ओढता खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेनुसार इतर उमेदवारांची नियुक्ती करण्यात यावी.

८) त्याचप्रमाणे शिक्षणांतर्गत शिष्यवृत्ती, वसतिगृह व व्यावसायिक शिक्षणांतर्गत शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ती योजनेमध्ये सदर आरक्षण लागू राहील.

९) अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या मुलाची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेरतपासणी आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे यांच्या मार्फत करणे आवश्यक राहील.

१०) अनाथ आरक्षणाबाबत करावयाच्या कार्यवाहीच्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

११) अनाथ आरक्षणाच्या लाभाच्या अनुषंगाने काही समस्या उद्भवल्यास त्याबाबत अभिनिर्णय घेण्याचा अधिकार शासनास राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४०२१३०९१३८०३० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandhya Sudhir Gawas

Digitally signed by Sandhya Sudhir Gawas
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Women And Child Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9af004e92d57921adf37df245e6a4d654bc630fcd0b0e13d1dd766b546c90f61, serialNumber=bfcea34b3e67580078284e564299f1fb5f9606206bcc59992327334b4690771c, cn=Sandhya Sudhir Gawas
Date: 2018.04.02 13:11:50 +05'30'

**( सं.सु.गवस )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.**

**प्रत,**

१. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
२. सर्व मंत्रालयीन विभाग
३. संचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
४. सचिव, महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग, वरळी, मुंबई.
५. आयुक्त, महिला व बाल विकास, पुणे.
६. सर्व उप सचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी, महिला व बाल विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सर्व विभागीय महिला व बाल विकास अधिकारी,
८. सर्व जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी.
९. निवड नस्ती / का-३